क्र.महसुल/क-१/टे-९/एनएपी/एसआर-१८६/२०१०
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक - 29 OCT 2010

वाचले :-

१. **श्री.गोपीकिसन जी पाटील रा.जुचंद्र ता.वसई, जि.ठाणे** यांचा अर्ज दिनांक १३/७/२०१०

२. असो.प्लॅनर, सिडको वसई यांचा बिनशेतीसाठी ना हरकत दाखला क्र सिडको/व्हीव्हीएसआर/बीपी/एनए एनओसी-३९४/ ई/९२४ दिनांक ७/७/२०१०

३. तहसिलदार वसई यांचेकडील पत्र क्रमांक/महसूल/जमिनबाब/एसआर-१४४ दिनांक ४/९/२०१०

४. १) विशेष भूसंपादन अधिकारी लघूपाटबंधारे, ठाणे यांचेकडील पत्र **क्र.भुस/ल.पा./एसआर-४००५ दि. १६/८/२०१०** २) विशेष भूसंपादन अधिकारी लघूपाटबंधारे, ५वा माळा ठाणे यांचेकडील पत्र **क्र.भूसंपादन/टे-१/२०१०/वशी-५०५/जा.क्र.७५५ दि. २७/८/२०१०** भूमी सपादन विशेष अधिकारी (विशेष घटक) ठाणे यांचेकडील **पत्र क्र. भुसविअ/नाहदा/१२४१ दि ३१/७/२०१०** ४) विशेष भूसंपादन अधिकारी, मेट्रो सेंटर-३,ठाणे यांचेकडील पत्र **क्र.भूस/मे.से-३/एसआर-४६३ दि.११/८/२०१०** ५) विशेष भूसंपादन अधिकारी, उल्हास खोरे प्रकल्प,ठाणे यांचेकडील पत्र क्र **भूसंपादन/टे.नं.१/वशी-५४७४५ दि. १७/८/२०१०**

५. अर्जदार यांनी सादर केलेले हमीपत्र दिनांक १/७/२०१०

६. अर्जदार यांनी सादर केलेले शपथपत्र दि.३०/९/२०१०

६. इकडील कार्यालयाने दिनांक २९/९/२०१० रोजीचे ' महाराष्ट्र जनमुद्रा' या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेला जाहिरनामा

---

आदेश :-

ज्याअर्थी **श्री.गोपीकिसन जी पाटील रा.जुचंद्र ता.वसई, जि.ठाणे** यांनी ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील मौजे -जूचंद्र येथील स.नं./हि.नं. ३८०/४ (जुना ३४४/४) क्षेत्र १०१०-०० चौ.मी. व मौजे- चंद्रपाडा येथील स.नं.८५/२(जुना स.नं.३५८/२) क्षेत्र ३४४०-०० चौ.मी., स.नं.८५/३ (जुना स.नं.३५८/३) क्षेत्र ३६४०-०० चौ.मी. असे एकूण क्षेत्र ८१७०-०० चौ.मी. जागेचा रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्या बाबत अर्ज केलेला आहे.

आणि ज्या अर्थी, प्रस्तावित जमीनीस बिनशेती परवानी देण्याच्या संदर्भात **दिनांक २९/९/२०१० रोजीचे दैनिक ' महाराष्ट्र जनमुद्रा '** या वृत्तपत्रात जाहीरनामा प्रसिध्द करणेत आला होता. सदर जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत एकही तक्रार/ हरकत या कार्यालयास प्राप्त झाली नाही.

त्याअर्थी आता महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये त्यांच्याकडे निहित करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी याद्वारे, कन्हैया लक्ष्मण म्हात्रे यांना ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील मौजे -जूचंद्र येथील स.नं./हि.नं. ३८०/४ (जुना ३४४/४) क्षेत्र १०१०-०० चौ.मी. व मौजे- चंद्रपाडा येथील स.नं.८५/२(जुना स.नं.३५८/२) क्षेत्र ३४४०-०० चौ.मी., स.नं.८५/३ (जुना स.नं.३५८/३) क्षेत्र ३६४०-०० चौ.मी. असे एकूण क्षेत्र ८१७०-०० चौ.मी. जागेचा रहीवास या बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्या बाबत पुढील शर्तीवर अनुज्ञा (परमीशन) देण्यांत येत सिडकोकडील मंजूर नकाशाप्रमाणे खालील क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय नाही.

१. चॅनल रिझर्व्हेशन एरिया - १४८-४६ चौ.मी.
२. २०मी.वाईड डी.पी.रोड - ४१०-८६ चौ.मी.

